MONSANTO

प्रिय मोन्सॅन्टो व्यवसाय भागीदार:

2006 च्या एप्रिलमध्ये, मोन्सॅन्टो कंपनीच्या संचालक मंडळाने आपल्या कंपनीसाठी मानवाधिकार धोरणाचा औपचारिक स्वीकार केला. मोन्सॅन्टोसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल होते आणि कंपनीचे मूल्य विधान अर्थात, मोन्सॅन्टो प्रतिज्ञेत अंतर्भूत मूल्यांनुसार आमचा विश्वास आणि आमची कृती यांचे हे नैसर्गिक प्रकटीकरण होते.

या धोरणातून आम्ही जेथे व्यवसाय करू तेथे आमची मानवाधिकारांप्रति वचनबद्धता अधोरेखित होते. बाल कामगार, सक्तीची मजुरी, भरपाई, कामाचे तास, त्रास आणि हिंसा, भेदभाव, सुरक्षा आणि संघटन स्वातंत्र्य यासंदर्भातील तरतुदी यात अंतर्भूत आहेत. आमचा विश्वास आहे की, हे धोरण आमचा व्यवसाय, आमचे कर्मचारी आणि आमचे पुरवठादार या सर्वांसाठी चांगले आहे.

तुम्हाला आमच्या धोरणाची कल्पना असावी म्हणून पुनरवलोकनासाठी एक प्रत तुम्हाला द्यायची आहे. मोन्सॅन्टोचे मानवाधिकार धोरण आणि संबंधित माहिती कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे, पहा: www.monsanto.com.

धोरणाच्या अनुसार, मोन्सॅन्टो अशा व्यवसाय भागीदारांना शोधेल व त्यांच्यासह व्यवसाय करेल जे या धोरणाशी सुसंगत असलेल्या नैतिक मापदंडानुसार व्यवसाय चालवू इच्छितात. मानवाधिकारांचे रक्षण आणि विकासाच्या दृष्टीने असलेल्या आमच्या वचनबद्धतेचा हा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.तुम्हीदेखील त्या वचनबद्धतेत सहभागी व्हावे अशी आमची आशा आहे.

आम्ही या धोरणाची अंमलबजावणी करताना, आम्हाला तुम्हाला सल्ला द्यायचा आहे. तोपर्यंत, धोरण, विशिष्ट तरतुदी किंवा आमची अंमलबजावणी योजना यासंबंधित काही प्रश्न असल्यास, मानवाधिकार टीम (या ईमेल द्वारे rights.human@monsanto.com) किंवा तुमच्या स्थानिक कंपनी प्रतिनिधीशी संपर्क साधा.

आपली विश्वासू,

मार्था बर्मास्टर
संचालक, मानवाधिकार
मोन्सॅन्टो कंपनी
rights.human@monsanto.com

# मानवाधिकार धोरण

(संचालक मंडळाद्वारे एप्रिल 19, 2006 रोजी स्वीकृत)

**प्रस्तावना/पार्श्वभूमी**

मानवाधिकारांचे रक्षण आणि त्यांचा विकास यांप्रति, मोन्सॅन्टो वचनबद्ध आहे. मानवाधिकारांचे वैश्विक घोषणापत्र (युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राईट्स) ज्यात मानवाधिकारांची सर्वाधिक स्वीकृत व्याख्या, आणि राष्ट्राच्या सरकारच्या जबाबदाऱ्या नमूद केलेल्या आहेत, तसेच मूलभूत तत्त्व आणि कमाच्या ठिकाणी असलेले हक्क यासंबंधी आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेचे घोषणापत्र या दोहोंचा आमच्या मानवाधिकार धोरणावर प्रभाव आहे.

मोन्सॅन्टो मानवाधिकार धोरण हे आमची प्रतिज्ञा आणि त्यातील आमच्या व्यवसाय मूल्याच्या चौकटीच्या मुळाशी घट्टपणे रुजलेले आहे. आमचे व्यवसाय वर्तणुक नियम (कोड ऑफ बिजनेस कन्डक्ट); दि मोन्सॅन्टो फन्ड; आमचे उत्पादन व्यवस्थापन कार्यक्रम; आमच्या वैश्विक पर्यावरण, सुरक्षा आणि आरोग्य नीती आणि प्रक्रिया; आणि आमचा सर्वसमावेशक नियामक कार्यक्रम यांच्या अनुसार हे धोरण कार्य करते तसेच त्यांची पुष्टी करते. (या कार्यक्रम आणि धोरणांबद्दलची माहिती मोन्सॅन्टो वेबसाईटवर तसेच ऑनलाईन मोन्सॅन्टो कंपनी प्रतिज्ञा अहवालामध्ये मध्ये उपलब्ध आहे.) या व्यतिरिक्त, मोन्सॅन्टोने धोरणाचा विकास करताना, शेती आणि शेतकी उद्योगाच्या विशिष्ट परिस्थितीचाही विचार केला आहे ज्यात मौसमी उत्पादनाचा समावेश होतो.

आम्ही आमचा व्यवसाय मानवाधिकारांच्या रक्षणाचा आदर करणाऱ्या नैतिक आणि जबाबदार पद्धतीने करतो. आम्ही अशा व्यवसाय भागीदारांना शोधू व त्यांच्यासह व्यवसाय करू जे या धोरणानुसार नैतिकता मापदंडांना अनुसरून व्यवसाय चालवू इच्छितात. आम्ही आमच्या व्यवसाय भागीदारांना विनंती करू इच्छितो की त्यांनी या धोरणात वर्णन केलेल्या प्रमुख बाबी आणि अपेक्षांच्या पूर्ततेप्रति तसेच, त्यानुसार व्यवसाय चालविण्यास आवश्यक पाउले उचलण्याप्रति असलेली त्यांची वचनबद्धता त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांप्रति पोहोचवावी. मोन्सॅन्टो अशी विनंती करू शकतो की, व्यवसाय भागीदाराने या धोरणातील घटक आणि बाबींचे ज्ञान आणि अनुसरण यांची खात्री द्यावी. व्यवसाय भागीदार या अपेक्षांनुसार कार्य करत आहे, हे पाहण्यासाठी व खात्री करून घेण्यासाठी, मोन्सॅन्टो आवश्यक पावले उचलू शकते जसे माहितीसाठी विनंती किंवा मोन्सॅन्टो द्वारे किंवा आम्ही नियुक्त केलेल्यांद्वारे तपासणी.

या धोरणाचे अनुसरण करण्याच्या दृष्टीने आणि त्यात निरंतर सुधारणा करण्याच्या आमच्या वचनबद्धतेच्या दृष्टीने, व्यवस्थापन कंपनीच्या अंमलबजावणी आणि तपासणी प्रयत्नांची आखणी करेल. मानवाधिकारांच्या विकासाच्या प्रयत्नांमध्ये, आमचा संवाद आणि क्रियाशील सहभाग आम्ही सुरू ठेवू. हे धोरण सर्व कर्मचारी, पुरवठादार, आणि लोकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**बाल मजुरी**

आंतरराष्ट्रीय मजूर संघटना करार 182, कलम 3 (बाल मजूरीचे सर्वात वाईट प्रकार) यात निर्दिष्ट केलेला कोणताही पिळवणूक करणारा बालमजुरी प्रकार मोन्सॅन्टोमध्ये खपवून घेतला जाणार नाही. यानुसार, अल्पवयीन मुलांच्या मजुरीशी संबंधित लागू स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय कायद्यांचे आम्ही पालन करू. जेथे अल्पवयीन मुलांची कायदेशीर नियुक्ती होत आहे, अशा ठिकाणी, आम्ही याची खात्री करून घेऊ की, अशा नियुक्तीमुळे मुलांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येत नाही. आमच्या सुरक्षा आणि आरोग्य नीती आणि प्रक्रियांच्या अनुसार, आम्ही लहान कर्मचाऱ्यांना कार्यस्थळी त्यांच्या आरोग्य किंवा सुरक्षेस धोका पोहोचेल अशा परिस्थितीत येऊ देत नाही.

**सक्तीची मजुरी**

मोन्सॅन्टो कोणत्याही प्रकारच्या करारबद्ध, गुलामीयुक्त, बंधक किंवा अन्य कोणत्याही सक्तीच्या मजुरीचा उपयोग करणार नाही. मोन्सॅन्टो कोणत्याही प्रकारच्या शारीरिक शिक्षेचा निषेध करते.

**मोबदला**

मोन्सॅन्टो कायद्यानुसार आवश्यक वेतन किंवा वेतन कायदा जेथे अस्तित्वात नसेल तेथे, स्थानिक उद्योग मानकांनुसार वेतना एवढे किंवा त्याहून जास्त वेतन देईल.

**कामाचे तास**

कामाच्या तासांच्या बाबतीत लागू स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय कायदे तसेच औद्योगिक पद्धतींचे मोन्सॅन्टो पालन करेल.

**त्रास आणि हिंसा**

त्रास विरहित तसेच कायद्याने संरक्षित असे कामाचे वातावरण निर्माण करण्यास मोन्सॅन्टो वचनबद्ध आहे. कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची हिंसा किंवा हिंसेची धमकी खपवून घेतली जाणार नाही.

**भेदभाव**

कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, कोणत्याही परिस्थितीत, प्रकारे किंवा नियुक्तीच्या विशेषाधिकारात, वंश, वर्ण, धर्म, लिंग, वय, राष्ट्रीयत्व, व्यंग, अनुभव, लैंगिकता किंवा लागू कर्मचारी कायद्यानुसार संरक्षित अन्य विशेषावरून भेदभावाचा मोन्सॅन्टो निषेध व मज्जाव करते.

**सुरक्षा**

आमच्या वैश्विक पर्यावरण, सुरक्षा आणि आरोग्य धोरणे आणि प्रक्रियांमध्ये सुरक्षित, निरोगी कार्यस्थळ आणि पर्यावरणदृष्ट्या दीर्घकालीन कार्य यांच्या प्रति वचनबद्धता दिसून येते.

**संघटन स्वातंत्र्य**

कर्मचाऱ्यांनां त्यांच्या आवडीच्या संघटनेत सहभागी होणे किंवा न होणे, स्वतंत्रपणे संघटित होणे आणि एकत्रित व्यवहार (कलेक्टिव्ह बार्गेन), या अधिकारांचा मोन्सॅन्टो स्वीकार करते व त्यांचा आदर करते. जेथे संघटन स्वातंत्र्य आणि एकत्रित व्यवहाराचा अधिकार कायद्याने मर्यादित केला आहे, तेथे, कंपनी कर्मचारी व्यवस्थापनात खुला संवाद आणि थेट वार्तालाप घडवून आणेल. कायदेशीर कर्मचारी संघटन किंवा युनियनच्या सदस्यत्वामुळे कोणत्याही कर्मचाऱ्याला बडतर्फी, भेदभाव, त्रास, ताण किंवा अस्वीकार सहन करावा लागणार नाही.

**कायद्यांचे पालन**

कमीत कमी, कंपनी जेथे व्यवसाय करत आहे तेथे, मानवाधिकारांशी संबंधित लागू असलेल्या स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय कायद्यांचे मोन्सेन्टो पालन करेल.